# BK BIRLA CENTRE FOR EDUCATION

SARALA BIRLA GROUP OF SCHOOLS
SENIOR SECONDARY CO-ED DAY CUM BOYS' RESIDENTIAL SCHOOL
ANNUAL EXAMINATION (2024-25)
MARATHI

Class : VIII | Duration : **3** Hrs
Date : 15.03.2025 | Max. Marks : **80**
Admission No.: | Roll No.:

---

**सूचना –** (1) सूचनेप्रमाणे प्रश्नांची उत्तरे लिहिणे.
(2) खंड – क ,ख, ग, घ नमूद करावेत.
(3) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष दयावे.

---

**[ खंड क वाचन कौशल्य ]**

**प्रश्न 1 अपठित गदयांश –** **(5)**

संस्थानिक राजर्षी शाहू महाराजांनी स्वतःच्या फायदयाचा विचार न करता नेहमी प्रजेचाच विचार केला. त्यांनी सुखसोयी निर्माण करताना समाजातील सर्वात दुर्लक्षित राहिलेल्या,दडपल्या गेलेल्या अस्पृश समाजाला अग्रक्रम दिला. शाहू महाराजांनी सामाजिक परिवर्तन साधण्यासाठी विविध उपक्रम सुरू केले आणि त्यावेळी उपक्रम चिरस्थायी व्हावेत याची काळजी त्यांनी घेतली. कोल्हापुरात वेगवेगळया समाजातील विदयार्थ्यांसाठी वेगवेगळी वसतिगृहे सुरू केली शिक्षणाच्या प्रसारावर त्यांचा भर होता. केवळ शाळा काढून भागणार नाही तर त्या शाळेत उत्तम शिक्षक हवे हे ते जाणून होते.

(1) शाहू महाराजांनी सुखसोयी निर्माण करताना कोणाला अग्रक्रम दिला?
**अ** स्त्रिया **ब** विदयार्थी **क** दुर्लक्षित अस्पृश्य **ड** सर्व समाज

(2) सामाजिक परिवर्तन साधण्यासाठी त्यांनी काय सुरू केले?
**अ** रोजगार **ब** उपक्रम **क** विदयालये **ड** कारखाने

(3) शाहू महाराजांनी वसतिगृहे कोठे सुरू केली?
**अ** नागपूर **ब** सोलापूर **क** विलासपूर **ड** कोल्हापूर

(4) शाहू महाराजांचा कशावर भर होता?
**अ** शिक्षणावर **ब** मनोरंजनावर **क** कामावर **ड** उदयोगांवर

(5) शाळेत उत्तम कोणाची आवश्यकता होती?
**अ** पुस्तकांची **ब** सेवकांची **क** कामगारांची **ड** शिक्षकांची

**प्रश्न 2 अपठित गदयांश –** **(5)**

बाबा आमटे वकिली करीत होते. ते वरोऱ्याच्या नगरपालिकेचे उपाध्यक्षही होते.परंतु एक दिवस रस्त्याच्या कडेला असहय वेदनांनी कण्हत असलेला महारोगी त्यांना दिसला. व महारोग्यांसाठी काहीतरी करण्याचा संकल्प त्याच्या मनाने घेतला व त्यातून आनंदवनाची निर्मिती झाली.15 ऑगस्ट 1949 रोजी एका झाडाखाली बाबांनी पहिला दवाखाना आनंदवनात सुरु केला. या कार्यात त्यांच्या पत्नीचा साधनाताईंचा मोलाचा वाटा होता. सुरूवातीला फक्त चार पाच महारोगी आनंदवनात होते. बाबांनी त्यांना जगण्याची उमेद दिली.

(1) बाबा आमटे कोणत्या नगरपालिकेचे नगराध्यक्ष होते ?
**अ** मुंबई **ब** रायपूर **क** वरोरा **ड** बडोदा

(2) त्याच्या पत्नीचे नाव काय होते?
**अ** राधाताई **ब** मीराताई **क** विदयाताई **ड** साधनाताई

(3) रस्त्याच्या कडेला एक दिवस कोण दिसले?
**अ** महारोगी **ब** महामंत्री **क** महालय **ड** महारोग

(4) कोणत्या दिवशी आनंदवनाची निर्मिती झाली?
**अ** 15 ऑगस्ट **ब** 16 ऑगस्ट **क** 10 ऑगस्ट **ड** 22 ऑगस्ट

(5) बाबांनी पहिला दवाखाना कोठे सुरू केला?

अ गावात　　ब झाडाखाली　　क शहरात　　ड घराखाली

## [ खंड ख व्याकरण ]

**प्रश्न 3 विरुधार्थी शब्द –** ( opposites ) (2)

(1) आत x ————————

अ मध्ये　　ब घरात　　क बाहेर

(2) सोपे x ————————

अ कठिण　　ब कठीण　　क कठीन

**प्रश्न 4 लिंग बदला –** ( change the gender ) (2)

(1) विव्दान = ————————

अ विज्ञान　　ब ज्ञानवान　　क विदुषी

(2) बैल = ————————

अ बकरी　　ब गाय　　क मेंढी

**प्रश्न 5 वचन बदला –** (write the plural noun ) (2)

(1) बक्षीस = ————————

अ बक्षिशे　　ब बक्षीसे　　क बक्षीसो

(2) टाळी = ————————

अ टाळया　　ब टाळ　　क माळ

**प्रश्न 6 समानार्थी शब्द लिहा–** (2)

(1) स्तब्ध = ————————

अ उभा　　ब शांत　　क शांतता

(2) समाधान = ————————

अ संतोष　　ब संतोश　　क संतोषी

**प्रश्न 7 काळ ओळखा –** (2)

(1) राम गाव सोडून शहरात राहत आहे .

(2) उदया माझी परीक्षा सुरू होणार.

**प्रश्न 8 दार प्रत्यय लावून नवीन शब्द बनवा –** (2)

(1) काम + दार = ————————

(2) रखवाल +दार = ————————

**प्रश्न 9 खालील वाक्यातील क्रियापद ओळखा–** (2)

(1) पोलीसाने गुन्हेगारांना पकडले.

(2) शिक्षकांनी मुलांना प्रश्न विचारले.

**प्रश्न 10 खालील वाक्यातील सर्वनाम ओळखा :–** (2)

(1) आम्ही सर्व उदया सुट्टीला घरी जाणार.

(2) तू मला तुझी वही दे.

## [ खंड ग साहित्य ]

**प्रश्न 11 पठित गदयांश –** (5)

जनक म्हणाले, विद्वत जनहो , हा जनक राजा नम्रपणे आपणास अभिवादन करीत आहे. आपल्या ज्ञानाला ,बुद्धीला प्रणाम करीत आहे. सर्वांनी मान वाकवून राजाला प्रतिसाद दिला. एक क्षणभर थांबून जनक पुढे बोलू लागले, हे ज्ञानवंतांनो बुध्दिवंतांनो आज मी येथे विव्दत सभा आयोजित केली आहे. खुल्या मनाने इथे ब्रम्हचर्चा व्हावी निकोप वादविवाद व्हावा जो कोणी विजयी ठरेल त्यासाठी बक्षीस म्हणून मी एक हजार गायी सोन्याने शृंगारून ठेवल्या आहेत. जो निर्विवाद जय मिळवील त्याने त्या गायी घेऊन जायच्या आहेत.

(1) वरील गदयांश कोणत्या पाठातून घेतला आहे ?

(2) कोणत्या सभेचे आयोजन केले गेले होते?

(3) सभेत कशावर चर्चा होणार होती?

(4) सोने या शब्दासाठी समानार्थी शब्द लिहा ?

(5) राजा जनकाने कोणते बक्षीस ठेवले होते?

**प्रश्न 12 पठित पदयांश –** **(5)**

उभा देश झाला आता एक बंदिशाला
जिथे देवकीचा पान्हा दुधाने जळाला
कसे पुण्य दुर्दैवी अन् पाप भाग्यशाली
धुमसतात अजुनी विझल्या चितांचे निखारे
अजून रक्त मागत उठती वधस्तंभ सारे

(1) वरील कविता कोणी लिहिला आहे ?
(2) कुणाचा पान्हा दुधाने जळाला?
(3) अजुनही काय धुमसत आहे?
(4) सुदैवी या शब्दासाठी विरूध्दार्थी शब्द लिहा ?
(5) कुणास बंदिशाला म्हटले गेले आहे?

**प्रश्न 13 जोडया लावा –** **(4)**

(1) प्रचंड –तरंग
(2) स्पर्धा – वेळ
(3) लाट – अफाट
(4) प्रसंग – चुरस

**प्रश्न 14 रिकाम्या जागा भरा –** **(4)**

(1) मकर संक्रांतीची –––– कथा सांगितली आहे.
(2) सारी ––– उठून उभी राहिली.
(3) एके दिवशी राज्यात –––– पिटवली.
(4) –––––– मढवलेला कट्टा आहे.

**प्रश्न 15 कोण कोणास म्हणाले लिहा –** **(2)**

(1) माणूस मेल्यानंतर त्याचे शिल्लक काय राहते?
(2) अक्षर म्हणजे काय?

**प्रश्न 16 खालील प्रश्नांची उत्तरे लिहा – ( कोणतेही सात)** **(7x2=14)**

(1) पंढरपूर कोठे वसले आहे?
(2) विष्णुपदाचे वर्णन करा?
(3) आम्ही कशाची वाट पाहू नये असे कवीला वाटते?
(4) कवी आयुष्याच्या मशाली पेटवण्यास का सांगत आहे?
(5) याज्ञवल्क्यांनी स्वतःचे श्रेष्ठत्व कसे सिध्द केले?
(6) सभेत कोण–कोण उपस्थित होते?
(7) मकर संक्रात हा सण स्त्रिया कसा साजरा करतात?
(8) जनाबाईंचे लक्ष कोणाच्या चरणापाशी लागले आहे ?
(9) कर्नल मार्शन स्वतःबद्दल काय म्हणाले ?

**[ खंड घ – लेखन ]**

**प्रश्न 17 आपल्या आवडत्या घडयाळासाठी एक आकर्षक जाहीरात तयार करा –** **(5)**

**प्रश्न 18 निबंध लेखन :– ( कोणताही एक )** **(5)**

(1) गणतंत्र दिन (2) माझा आवडता देशभक्त (3) माझा आवडता सण

**प्रश्न 19 स्वपरिचय लिहा :– ( my self in marathi )** **(5)**

**प्रश्न 20 आपली खुशाली कळविणारे पत्र आईस लिहा –** **(5)**

**किंवा**

**आपल्या वाढदिवसाचे निमंत्रण देणारे पत्र मित्रास लिहा –**

**———————— समाप्त ————————**